**घटक I : आर्थिक विकास आणि वाढ**

# १. आर्थिक विकास

## (Economic Development)


१.१ प्रास्ताविक
१.२ वाढ आणि विकास
१.३ आर्थिक वाढ : अर्थ, व्याख्या व वैशिष्ट्ये
१.४ आर्थिक विकास : अर्थ, व्याख्या व वैशिष्ट्ये
१.५ आर्थिक वाढ व विकास यामधील फरक
१.६ आर्थिक विकासाला प्रभावित करणारे घटक
१.७ प्रश्नसंग्रह


### १.१ प्रास्ताविक

आर्थिक विकासाचा प्रश्न हा जगातील सर्वच देशांसमोरील प्रमुख प्रश्न आहे. श्रीमंत व गरीब, विकसित व विकसनशील अशा सर्वच प्रकारच्या देशांना आर्थिक विकासाच्या प्रश्नाला तोंड द्यावे लागत आहे. फरक एवढाच आहे की, श्रीमंत व गरीब देशांसमोरील प्रश्नाचे स्वरूप थोडे भिन्न असते. **मायर** आणि **बाल्डविन** यांनी म्हटल्याप्रमाणे, **''विकासाचा वेग कायम ठेवणे हा श्रीमंत देशांसमोरील प्रश्न असतो, तर विकासाचा वेग वाढविणे हा गरीब देशासमोरील प्रश्न असतो.''** अशाप्रकारे आर्थिक विकासाचा प्रश्न सर्वच देशांना भेडसावत असल्यामुळे आर्थिक वाढ आणि आर्थिक विकास म्हणजे नेमके काय? व त्यांचे निर्देशक कोणते इत्यादी बाबींचा विचार करणे आवश्यक असते.

### १.२ 'वाढ' (वृद्धी) आणि 'विकास' (Growth & Development)

सामान्यपणे **'वाढ'** आणि **'विकास'** हे दोन्ही शब्द एकाच अर्थाने वापरले जातात. ते एखाद्या बाबीमध्ये झालेले सकारात्मक स्वरूपाचे बदल दर्शवितात. परंतु त्यात सूक्ष्म असा फरक केला जातो. **'वाढ'** हा शब्द संख्यात्मक किंवा परिमाणात्मक बदल दर्शविण्यासाठी वापरला जातो. याउलट **'विकास'** हा शब्द गुणात्मक बदल दर्शविण्यासाठी वापरला जातो. **'वाढ'** हा शब्द एकांगी बदल दर्शवितो, तर **'विकास'** हा शब्द अनेकांगी बदल दर्शवितो. **'वाढ'** आणि **'विकास'** या शब्दांतील फरक पुढील उदाहरणावरून स्पष्ट होईल.

समजा, एका महाविद्यालयात प्रारंभीच्या काळात एक हजार विद्यार्थी शिक्षण घेत होते. लोकसंख्या वाढीमुळे दरवर्षी विद्यार्थी संख्येत वाढ होऊन ती संख्या आता जवळपास दुप्पट झाली आहे. विद्यार्थी संख्या वाढल्यामुळे शिक्षक व कर्मचाऱ्यांची संख्या वाढली असेल तर या स्थितीला महाविद्यालयाची वाढ म्हणता येईल, विकास म्हणता येणार नाही. याउलट विद्यार्थी संख्येच्या वाढीबरोबरच इमारतीचा विस्तार झाला असेल, निकालाच्या टक्केवारीतही

सुधारणा झाली असेल, काही विद्यार्थी गुणवत्ता यादीत आले असतील, काहींची चांगल्या नोकऱ्यांकरिता निवड झाली असेल, काहींनी क्रीडा, मनोरंजन, समाजसेवा इत्यादी विविध क्षेत्रात महाविद्यालयाला नावलौकिक मिळवून दिला असेल तर अशा स्थितीला महाविद्यालयाचा विकास होत आहे असे म्हणता येईल.

वरीलप्रमाणे **'वाढ'** आणि **'विकास'** या शब्दांतला फरक समजून घेतल्यानंतर आता 'आर्थिक वाढ' आणि 'आर्थिक विकासाची' संकल्पना समजावून घेऊ.

## १.३ आर्थिक वाढ : अर्थ व व्याख्या

### (Economic Growth : Meaning & Definition)

**'आर्थिक वाढ'** या संकल्पनेची सर्वमान्य अशी व्याख्या करता येणार नाही. कारण वेगवेगळ्या अर्थशास्त्रज्ञांनी आर्थिक वाढीचा अर्थ वेगवेगळ्या प्रकारे सांगितला आहे. काही अर्थशास्त्रज्ञांच्या मते, **''अर्थव्यवस्थेच्या ढोबळ (सकल) देशी उत्पादनात (Gross Domestic Product) सातत्याने दीर्घकाळपर्यंत वाढ होत जाण्याची प्रक्रिया म्हणजे आर्थिक वाढ होय.''**

आर्थिक वाढीची वरील व्याख्या बरोबर वाटत नाही. कारण लोकसंख्येतील वाढ ही ढोबळ देशी उत्पादनाच्या वाढीपेक्षा जास्त असेल तर दरडोई ढोबळ देशी उत्पादनात घट होईल. अर्थातच या स्थितीला आर्थिक वाढ म्हणता येणार नाही.

म्हणून **कुजनेत्स** (Kuznets) या अर्थशास्त्रज्ञाचे मत असे आहे की, **''आर्थिक वाढीच्या परिस्थितीत वाढत्या लोकसंख्येबरोबर दरडोई उत्पादनात (उत्पन्नात) सुद्धा वाढ झाली पाहिजे.''**

**कुजनेत्स** यांच्या मते, आर्थिक वाढ ही प्रामुख्याने (i) ढोबळ देशी उत्पादनाच्या वाढीचा दर आणि (ii) लोकसंख्या वाढीचा दर या दोन घटकांवर अवलंबून असते. यापैकी ढोबळ देशी उत्पादनातील वाढीचा दर हा लोकसंख्या वाढीच्या दरापेक्षा जास्त असेल तर दरडोई उत्पन्नात वाढ होऊन त्याला आर्थिक वाढ असे म्हणता येईल.

कुजनेत्स यांचे वरील मत विचारात घेऊन काही अर्थशास्त्रज्ञांनी **''दरडोई उत्पन्नातील वाढ म्हणजे आर्थिक वाढ होय.''** असे म्हटले आहे. दरडोई उत्पन्नाचा निकष वापरून **प्रो. मिलर** यांनी आर्थिक वाढीची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे :

**''आर्थिक वाढ ही एक प्रक्रिया आहे की, ज्यात दीर्घकाळपर्यंत वास्तविक दरडोई उत्पन्नात वाढ होत असते.''** (''Economic Growth is a process, whereby the real per-capita income increases over a long period.'')

### आर्थिक वाढीची वैशिष्ट्ये (Features of Economic Growth)

वरील व्याख्येवरून आर्थिक वाढीची पुढील वैशिष्ट्ये स्पष्ट होतात :

(अ) **सतत व नियमित प्रक्रिया** – आर्थिक वाढ म्हणजे वस्तू व सेवांच्या उत्पादनातील वाढ होय. अर्थव्यवस्थेतील उपलब्ध साधनसामग्रीचा काटकसरीने वापर करून महत्तम उत्पादन

घेतले जाते. उत्पादनाची ही प्रक्रिया सतत व नियमित चालू असते. त्यामुळे उत्पादनात वाढ होऊन आर्थिक वाढ घडून येते.

**(२) दरडोई वास्तविक उत्पन्नात वाढ** – आर्थिक वाढीच्या काळात राष्ट्रीय उत्पन्न व दरडोई उत्पन्न यात वाढ होत असते. एकूण राष्ट्रीय उत्पन्नाला एकूण लोकसंख्येने भाग दिला असता दरडोई उत्पन्न मिळते. राष्ट्रीय उत्पन्नातील वाढीचा दर हा लोकसंख्या वाढीच्या दरापेक्षा जास्त असेल तर दरडोई उत्पन्नात वाढ घडून येईल.

**(३) दीर्घकालीन प्रक्रिया** – अर्थव्यवस्थेत दीर्घकाळपर्यंत वास्तविक दरडोई उत्पन्नात सतत वाढ होत असेल, तर आर्थिक वाढ घडून येईल. एखाद्या वर्षी अनुकूल परिस्थितीमुळे उत्पादनात वाढ होत असेल तर तिला आर्थिक वाढ म्हणता येणार नाही.

**(४) संख्यात्मक संकल्पना** – आर्थिक वाढीची संकल्पना संख्यात्मक स्वरूपाची असून त्यात गुणात्मक बाजूला महत्त्व दिले जात नाही. म्हणजे आर्थिक वाढीमध्ये सकल राष्ट्रीय उत्पन्नात व दरडोई उत्पन्नात वाढ झाली काय ह्याचा विचार केला जातो. परंतु उत्पन्न वाढीबरोबर दारिद्र्य व विषमता कमी झाली आहे किंवा नाही याकडे लक्ष दिले जात नाही.

**(५) संकुचित संकल्पना** – आर्थिक वाढीच्या संकल्पनेत केवळ संख्यात्मक बाबींवरच भर दिला जातो, गुणात्मक बाबींकडे दुर्लक्ष केल्या जाते. त्यामुळे आर्थिक वाढीची संकल्पना संकुचित स्वरूपाची आहे असे म्हटले जाते.

थोडक्यात, राष्ट्रीय उत्पादन आणि वास्तविक दरडोई उत्पन्न यात दीर्घकाळपर्यंत सातत्याने नियमितपणे होणाऱ्या वाढीला आर्थिक वाढ असे म्हणता येईल.

## १.४ आर्थिक विकास : अर्थ व व्याख्या

## (Economic Development : Meaning & Definition)

प्रारंभीच्या अर्थशास्त्रीय विवेचनात **'आर्थिक वाढ'** आणि **'आर्थिक विकास'** या दोन्ही संकल्पना एकच समजून त्यात भेद केला जात नसे. विसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत **'आर्थिक वाढीलाच' 'आर्थिक विकास'** म्हटले जात होते. परंतु आता या दोन्ही संकल्पनांमध्ये फरक केला जातो. आर्थिक वाढ म्हणजे राष्ट्रीय उत्पन्न आणि दरडोई उत्पन्न यातील वाढ होय. तर आर्थिक विकास म्हणजे आर्थिक वाढ अधिक रचनात्मक बदल होय. आर्थिक वाढीमध्ये परिमाणात्मक बदल विचारात घेतले जातात, तर आर्थिक विकासामध्ये गुणात्मक बदलांचा विचार केला जातो.

आर्थिक विकासाच्या बाबतीत दोन मतप्रवाह आढळून येतात. पहिला, परंपरागत मतप्रवाह असून दुसरा आधुनिक मतप्रवाह आहे.

(अ) **परंपरागत मतप्रवाहानुसार – "आर्थिक विकास अशी स्थिती आहे की ज्यात राष्ट्रीय (किंवा देशी) उत्पादनात दरवर्षी ५ ते ७ टक्के वाढ होत असते आणि उत्पादन व रोजगाराच्या रचनेमध्ये अशा प्रकारचे बदल होतात की ज्यात शेतीचा वाटा कमी होत जाऊन उद्योग व सेवा क्षेत्राचा वाटा वाढत जातो."**

अशाप्रकारे या मतप्रवाहानुसार शेतीच्या ऐवजी औद्योगीकरणाचा वेग वाढविण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. त्यामुळे सकल देशी उत्पादन आणि दरडोई उत्पादन यात वाढ होऊन गरिबी, विषमता व बेकारी यांचे निवारण करणे शक्य होईल.

विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात असे दिसून आले की अर्धविकसित देशात आर्थिक वाढ होऊन देखील त्यापासून ४० टक्के लोकसंख्येला कोणताही फायदा मिळाला नाही. त्यांच्या आर्थिक स्थितीत कोणत्याही प्रकारची सुधारणा झाली नाही. त्यामुळे अनेक अर्थशास्त्रज्ञांनी आर्थिक विकासाच्या परंपरागत मतप्रवाहाचा त्याग करून त्याऐवजी त्यांनी आर्थिक विकासाची नव्याने व्याख्या केली.

**(ब) आधुनिक मतप्रवाहानुसार, 'आर्थिक विकासाचा मुख्य उद्देश दारिद्र्य, विषमता आणि बेकारी यांचे निवारण करणे हा आहे आणि त्यासाठी त्यांनी 'पुनर्वितरणासह आर्थिक वाढ'** (Redistribution with growth) **या तत्त्वावर भर दिला आहे.'**

(१) या संदर्भात **किन्डलबर्गर** आणि **हैरिक** यांचे विधान महत्त्वाचे समजले जाते. त्यांच्या मते, **''लोकांच्या भौतिक कल्याणात सुधारणा म्हणजे आर्थिक विकास होय.''**

ज्यावेळी देशातील विशेषत: कमी उत्पन्न असणाऱ्या लोकांच्या भौतिक कल्याणात वाढ होते; त्यावेळी सर्वसामान्य लोकांची निरक्षरता, रोगराई, बालमृत्यू व त्याचबरोबर गरिबीपासून मुक्तता होते. शेती हा त्यांचा मुख्य व्यवसाय न राहता वेगाने औद्योगिकीकरण घडून येते. उत्पादनाचे स्वरूप व उत्पादक घटकांचे स्वरूप यात बदल घडून येतो. त्यामुळे संपूर्ण अर्थव्यवस्थेचे स्वरूप बदललेले दिसते, यालाच आपण आर्थिक विकास झाला असे म्हणू शकतो.

(२) **डडले सीअर्स** (Dudley Seers) यांनी आर्थिक विकासाचा अर्थ स्पष्ट करताना काही मूलभूत प्रश्न उपस्थित केले आहेत. त्यांच्या मते, कोणत्याही देशाच्या आर्थिक विकासाबाबत चर्चा करताना काही प्रश्नांकडे लक्ष देणे आवश्यक आहे. ते प्रश्न म्हणजे **गरिबीचे प्रमाण कमी होत आहे काय? बेकारीचे प्रमाण कमी होत आहे काय? उत्पन्नातील विषमता कमी होत आहे काय? जर या तिन्ही प्रश्नांची उत्तरे होकारार्थी असतील तर निश्चितपणे आर्थिक विकास झाला आहे असे म्हणता येईल.** परंतु यापैकी एक किंवा दोन किंवा सर्व प्रश्नांचे उत्तर नकारार्थी असेल तर अशा स्थितीला जरी दरडोई उत्पन्न दुप्पट झाले असेल, तरी आर्थिक विकास म्हणणे योग्य होणार नाही.

(३) पाकिस्तानचे अर्थशास्त्रज्ञ **महबूब-उल-हक** यांच्या मते, **''आर्थिक विकासाने गरिबीवर प्रहार केला पाहिजे. गरिबी, भूकबळी, रोगराई, निरक्षरता, बेकारी आणि असमानता यासारख्या समस्यांचे निवारण करणे हे विकासाचे प्रमुख लक्ष्य असले पाहिजे.''**

आतापर्यंत आपण ढोबळ राष्ट्रीय उत्पादनाच्या वाढीवर भर देत होतो, कारण ते गरिबी दूर करण्यात साहाय्यभूत ठरते. आता हे संबंध उलट करण्याची वेळ आली आहे. आता गरिबीवर लक्ष केंद्रित करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. असे केले तर ढोबळ

देशी उत्पादनात आपोआप वाढ होत जाईल. दुसऱ्या शब्दात, आता केवळ राष्ट्रीय उत्पादनाच्या वाढीच्या दरापेक्षा त्याच्या रचनेवर अधिक लक्ष देणे आवश्यक आहे.

वरील विवेचनाच्या आधारावर काही अर्थशास्त्रज्ञांनी आर्थिक विकासाची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे :

**''आर्थिक विकास म्हणजे आर्थिक वाढ आणि त्याबरोबर जे तुलनात्मकदृष्ट्या गरीब आहेत त्यांच्यामध्ये संसाधनाचे वितरण करणे होय. असे केल्याने आर्थिक विषमता कमी होऊन गरिबी व बेकारी कमी होण्यास मदत होईल.''**

## आर्थिक विकासाची वैशिष्ट्ये

वरील व्याख्यांवरून आर्थिक विकासाची पुढील वैशिष्ट्ये स्पष्ट होतात.

**(१) निरंतर प्रक्रिया** – आर्थिक विकासाचे पहिले वैशिष्ट्य आहे की, ती एक सतत व निरंतर (अखंडपणे) चालणारी प्रक्रिया आहे. ही प्रक्रिया सतत सुरू असते त्यामुळे आर्थिक घटकांमध्ये सतत बदल होत असतात. हे बदल दोन प्रकारचे असतात. (i) आधारभूत साधनांच्या पुरवठ्यात बदल (ii) वस्तूंच्या मागणीच्या संरचनेतील बदल. यापैकी प्रथम प्रकारात (म्हणजेच आधारभूत साधनांच्या पुरवठ्यातील बदल) जास्तीच्या नवीन साधनांचा शोध, भांडवलनिर्मिती, आधारभूत लोकसंख्येतील वाढ, उत्पादनाच्या नवीन आणि सुधारलेल्या पद्धतींचा वापर आणि इतर संस्थात्मक बदलांचा समावेश होतो. दुसऱ्या प्रकारात वस्तूच्या मागणीच्या संरचनेतील बदल, लोकसंख्येचा आकार तसेच वयोगटाप्रमाणे विभागणी, उत्पन्नातील वाटणीचे स्वरूप, आवडी-निवडी व संरचनात्मक आणि संघटनात्मक परिवर्तनांचा समावेश होतो.

**(२) राष्ट्रीय उत्पन्नात वाढ** – वास्तविक राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होणे हे आर्थिक विकासाचे गमक होय. परंतु या ठिकाणी आर्थिक विकासाचे मापन करण्यासाठी मिश्र राष्ट्रीय उत्पादनाऐवजी शुद्ध राष्ट्रीय उत्पादनाचा उपयोग केला जातो. कारण मिश्र राष्ट्रीय उत्पादनात भांडवलाचा प्रतिस्थापन व्यय समाविष्ट होतो. एखाद्या देशात एका वर्षाच्या अंतर्गत उत्पादित झालेल्या अंतिम वस्तूंच्या व सेवांच्या मौद्रिक मूल्याला एकूण राष्ट्रीय उत्पादन म्हणतात. परंतु वस्तूंचे आणि सेवांचे उत्पादन करण्यासाठी ज्या उपकरणाचा उपयोग केला जातो त्याची सतत झीज होत असते व झीज झाल्यामुळे त्यांचा मूल्य ऱ्हास होतो. त्यामुळेच उत्पादनाची क्रिया अखंडपणे चालू ठेवण्यासाठी एकूण उत्पन्नाचा एक हिस्सा या उपकरणांचे प्रतिस्थापन करण्यासाठी खर्च करावा लागतो. या खर्चाला प्रतिस्थापन व्यय (Replacement costs) म्हणतात आणि हा प्रतिस्थापन व्यय त्या उपकरणाच्या मूल्यऱ्हासाबरोबर असतो म्हणून एकूण राष्ट्रीय उत्पादनातून या उपकरणांच्या झीजेचा खर्च किंवा मूल्य ऱ्हास वजा केल्यास उरलेले उत्पन्न शुद्ध राष्ट्रीय उत्पादन (Net National Product – NNP) होय.

काही अर्थशास्त्रज्ञांच्या मतानुसार आर्थिक विकासाचा संबंध केवळ वास्तविक राष्ट्रीय उत्पन्नाऐवजी दरडोई वास्तविक राष्ट्रीय उत्पन्नातील वाढीबरोबर जोडणे योग्य होईल. यात प्रामुख्याने **प्रो. आर्थर लेविस** यांचा उल्लेख करावा लागेल. त्यांच्या मते, ''आर्थिक विकास म्हणजे दरडोई उत्पादनातील वाढ होय.''

(३) **दीर्घकालीन प्रक्रिया** – आर्थिक विकासाच्या दृष्टिकोनातून राष्ट्रीय उत्पन्नात सतत वाढ व्हावयास पाहिजे आणि राष्ट्रीय उत्पन्नात सतत वाढ होण्यासाठी दीर्घकाळ आवश्यक असतो. अल्पकाळात व्यापार चक्रामुळेदेखील राष्ट्रीय उत्पन्नात वाढ झालेली आढळते, परंतु तिला आर्थिक विकास असे संबोधता येत नाही. प्रत्यक्षात एका व्यापारचक्राच्या अंतर्गत देशाच्या वास्तविक उत्पन्नात होणारी वाढ म्हणजे आर्थिक विकास नसून विविध व्यापारचक्रातील राष्ट्रीय उत्पन्नात होणाऱ्या वाढीला आर्थिक विकास म्हणतात. एक मोठे व्यापारचक्र ६ ते १३ वर्षांच्या अवधीचे असते म्हणून सतत आर्थिक विकासासाठी कमीत कमी २५ वर्षांचा काळ पुरेसा मानला जातो.

(४) **गुणात्मक संकल्पना** – आर्थिक विकासामध्ये गुणात्मक बदल होणे अपेक्षित आहे. म्हणजे राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होत असताना उत्पन्नातील विषमता कमी झाली पाहिजे त्यामुळे देशातील दारिद्र्य व बेकारी कमी होण्यास मदत होईल.

(५) **व्यापक संकल्पना** – आर्थिक विकासामध्ये संख्यात्मक वाढ होत असताना गुणात्मक बाजूने सकारात्मक बदल होणे अपेक्षित आहे. अशाप्रकारे आर्थिक विकास म्हणजे आर्थिक वाढ अधिक आर्थिक संरचनेत झालेले गुणात्मक बदल होय.

## १.५ आर्थिक वाढ आणि आर्थिक विकास यामधील फरक

**श्रीमती उर्सुला हिक्स** यांच्या मते, 'आर्थिक विकास आणि आर्थिक वाढ यात फरक करणे कठीण आहे.' जे देश आर्थिक दृष्टीने विकसित असतात आणि जेथे उत्पन्नाची अधिकांश साधने विकसित व ज्ञात असतात त्यांच्यासाठी 'आर्थिक वाढ' या शब्दांचा उपयोग केला जातो. याउलट जे देश अर्धविकसित असतात, ज्यात उपलब्ध उत्पादनाच्या साधनांचा विकास अजिबात झालेला नसतो किंवा अपूर्ण स्वरूपात झालेला असतो, अशा देशांच्या संदर्भात 'आर्थिक विकास' या शब्दाचा वापर केला जातो.

**प्रो. शुम्पीटरने** मात्र आर्थिक विकास व आर्थिक वाढ यात फरक केलेला आहे. त्यांच्या मते, "आर्थिक वृद्धीचा सिद्धांत प्रतिपादन करतो की आर्थिक जीवन प्रत्येक वर्षी त्याच प्रवाहातून वाहत जात असते ज्याप्रकारे प्राणिमात्रात रक्ताचे अभिसरण होत असते. शुम्पीटरच्या या विधानाचा अर्थ असा होतो की, आर्थिक वृद्धीच्या अंतर्गत आपण नवीन निर्मितीचा विचार करू शकत नाही. जे उत्पादन होते ते परंपरागत व नियमित पद्धतीने होत असते आणि कोणतेही नावीन्य निर्माण झालेले आढळत नाही. परंतु आर्थिक विकास म्हणजे त्याच प्रकारच्या भौतिक वस्तूंच्या उत्पादनात वाढ होणे असा अर्थ नसून पूर्णपणे नवीन वस्तूंचे उत्पादन होणे किंवा प्रचलित वस्तूंमध्ये निरंतर सुधारणा होणे असा आर्थिक विकासाचा अर्थ होतो.

वर्तमानकाळात आर्थिक विकास शब्दाचा उपयोग आर्थिक वाढ या शब्दापेक्षा अधिक व्यापक अर्थाने केला जात आहे. स्थूलमानाने आर्थिक विकासाचा अर्थ आर्थिक वाढ आणि आर्थिक बदल या दोन्ही अर्थाने केला जातो. अशाप्रकारे आर्थिक विकास मानवाच्या सर्वांगीण विकासाशी संबंधित आहे.

'आर्थिक वाढ' आणि 'आर्थिक विकास' यातील फरक

| फरक | आर्थिक वाढ | आर्थिक विकास |
|---|---|---|
| (१) अर्थ | आर्थिक वाढ म्हणजे राष्ट्रीय उत्पन्न आणि विशेषतः दरडोई उत्पन्न यात दीर्घकालपर्यंत नियमितपणे वाढ होण्याची प्रक्रिया होय. | आर्थिक विकास म्हणजे आर्थिक वाढ अधिक अर्थव्यवस्थेतील आर्थिक व सामाजिक रचनेत झालेले बदल होय. |
| (२) मापन | आर्थिक वाढीचे मापन केवळ संख्यात्मक किंवा परिमाणात्मक बदलावरून केले जाते. उदा. राष्ट्रीय व दरडोई उत्पन्नात वाढ होणे. | आर्थिक विकासाचे मापन गुणात्मक बदलावरून केले जाते. उदा. उत्पन्नातील विषमता, बेरोजगारी व दारिद्र्य यात घट होणे. |
| (३) प्राथमिकता | आर्थिक वाढीच्या स्थितीत उत्पादन वाढीला प्राथमिकता दिली जाते. | आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत उत्पादन वाढीबरोबरच वितरणाला महत्त्व दिले जाते. |
| (४) विविध समस्या | आर्थिक वाढीच्या स्थितीत अर्थव्यवस्थेत उत्पन्नातील विषमता, दारिद्र्य, बेकारी इत्यादी समस्या अस्तित्वात राहू शकतात. | आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत अर्थव्यवस्थेतील उत्पन्नातील विषमता, दारिद्र्य व बेकारी इत्यादी समस्या दूर करण्याचे प्रयत्न केले जातात. |
| (५) राष्ट्रीय उत्पन्नातील हिस्सा | आर्थिक वाढीच्या स्थितीत शेतीचा राष्ट्रीय उत्पन्नातील हिस्सा महत्त्वपूर्ण असतो. | आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत राष्ट्रीय उत्पन्नातील शेतीचा हिस्सा कमी-कमी होत जातो तसेच उद्योग व सेवा क्षेत्राचा हिस्सा वाढत जातो. |
| (६) व्यावसायिक विभाजन | आर्थिक वाढीच्या प्रक्रियेत लोकसंख्येचा मोठा भाग शेतीवर अवलंबून असतो. | आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत शेतीवर उपजीविका करणाऱ्यांचे प्रमाण कमी होत जाते आणि उद्योग व सेवा क्षेत्रात काम करणाऱ्यांचे प्रमाण वाढत जाते. |
| (७) प्रक्रियेचे स्वरूप | आर्थिक वाढ ही स्वयंस्फूर्त प्रक्रिया आहे. यात परंपरागत वस्तूंचे परंपरागत साधनांच्या साहाय्याने उत्पादन घेतले जाते. | आर्थिक विकासासाठी विशेष प्रयत्न करण्याची आवश्यकता असते. यात नवीन तंत्राचा वापर करून नवीन वस्तूंचे उत्पादन घेतले जाते. |
| (८) संकल्पना | आर्थिक वाढ ही संकल्पना संकुचित स्वरूपाची आहे. | आर्थिक विकास ही संकल्पना व्यापक स्वरूपाची आहे. |